भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ५४७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—३०/०८/२०१६

१) गोसेखुर्द पुर्नवसन कार्यालय येथील पंखा व रेगुलेटरची चोरी. :—

दिनांक २८/०८/०१६ चे १०.४५ वा. ते दि.२९./८/२०१६ चे १०.०० वा. दर. यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने कोनीही नसल्याची संधी साधुन गोसे खुर्द पुर्नवसन उपविभाग क्र.०५ कार्यालय पलाडी येथील खिडकीचे काच फोडुन व लोखंडी रॉड कापुन आत प्रवेश करून छतावर लावलेला उषा कंपनीचा फॅन रेगुलेटर सहीत कि. २०००/रू चा माल चोरून नेल्याने फिर्यादी निंबाजी सुधाकर बोरूडे वय ३४ वर्ष रा. अंबाडी (पद—वरिष्ट लिपीक गोसे खुर्द पुर्नवसन उपवीभाग क्र.०५ कार्यालय पलाडी) यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

२) भांडण करून मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २४/०८/०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील दोन्ही आरोपीतांनी संगमत करून फिर्यादीचे घरात जावुन मारपीट करण्याचे उद्देशाने फिर्यादीस 'तु कमलेस वालदे याची विनाकारन बदनामी का करतेस' असे बोलुन भांडन केले व फिर्यादीचे गालावर आणि पाठीवर थापड बुक्यांनी मारपीट करून धमकी दिली असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५१,३२३,५०६,३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आळे हे करीत आहेत.

३) भांडण व डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—

दिनांक २८/०८/२०१६ रोजी १५.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रभाकर शामराव बांडेबुचे वय ३४ वर्ष रा. बाम्हणी याने आरोपीला 'तुझ्या गाईचा मेलेला वासरू माझ्या धु—यावर का फेकला' असे हटकले व आरेपीने ति जागा तुझ्या बापाची आहे का? असे बोलुन भांडण करून लोंखडी कुलुपाने डोक्याचे उजव्या बाजुला जखमी करून शिवीगाळ केले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—

दिनांक २९/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, कारधा, वरठी, तुमसर गोबरवाही, साकोली व लाखांदुर येथील अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण १७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ८४ लिटर हातभट्टी + मो.सा.+साहीत्य कि. २११२०/रू व देशी दारू १५ लिटर १२० मिली देशी दारू कि.४२००/रू तसेच जुगारातुन ७६७०/रू असा एकुण कि.३२,९९०/—रू. चा माल जप्त करण्यात आहे.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.